देवेंद्र फडणवीस यांची जपान सरकारला विनंती; वर्सोवा-विरार सीलिंकसाठी सहकार्य

# मुंबईच्या पूर नियंत्रणासाठी जपानने सहकार्य करावे

मुंबई : मुंबईच्या पुराची समस्या सोडवण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पाला सहकार्य करण्याची विनंती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी जपानच्या जायका कंपनीकडे केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जपान दौऱ्याच्या चौथ्या दिवशी जायकाचे वरिष्ठ उपाध्यक्ष नाकाझावा केईचिरो यांची भेट घेतली. जपान सरकारने वर्सोवा-विरार सी-लिंकला संपूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.



## मित्सुबिशी पुण्यात सेमिकंडक्टर निर्मिती करणार

मित्सुबिशीचे उपाध्यक्ष हिसाहिरो निशिमोटो यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. तळेगाव येथे मित्सुबिशीने गुंतवणूक केली असून, पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पासून सुरू होणार आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित करण्याचा महाराष्ट्राचा मनोदय असून, मित्सुबिशीसुद्धा या क्षेत्रात काम करीत आहे. महाराष्ट्रात आणखी विस्तार करण्यास मित्सुबिशीने अनुकूलता दर्शवली आहे. सॉफ्टवेअर क्षेत्रात पुण्यात आणखी गुंतवणूक करणार असल्याचे मित्सुबिशीच्या वतीने यावेळी सांगण्यात आले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी जपानचे केंद्रीय आर्थिक, व्यापार आणि उद्योग मंत्री यासुतोशी निशिमुरा यांची भेट घेतली. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, मेट्रो ३ प्रकल्प उभारणीत सहकार्य केल्याबद्दल फडणवीस यांनी जपान सरकारचे आभार मानले. तसेच मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी आपण सुद्धा यावे, अशी विनंती फडणवीस यांनी निशिमुरा यांना केली.

यासुतोशी निशिमुरा म्हणाले, ''जपान जी-७ गटाचे नेतृत्व करत असून भारत जी-२० चे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे हे दोन देश जागतिक पातळीवर मोठी भूमिका बजावू शकतात. जपान सरकार सातत्याने लघु उद्योगांना सहकार्य करीत आहे. वर्सोवा-विरार सी-लिंकलादेखील जपान सरकार संपूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''महाराष्ट्र हे उद्योगांचे पॉवरहाऊस आहे. सुमारे ७५० जपानी कंपन्या महाराष्ट्रात आहेत. आता महाराष्ट्रात सिंगल विंडो परवानगीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बुलेट ट्रेनसंदर्भात सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून, काम अतिशय वेगाने सुरू आहे. मेट्रो-३ चे सर्व प्रलंबित विषय आता मार्गी लागले असून, त्याचेही काम अंतिम टप्प्यात आहे. वर्सोवा-विरार सी-लिंक प्रकल्प अतिशय महत्त्वपूर्ण असून, पोर्ट कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ करण्यावर राज्य सरकारने अधिक लक्ष केंद्रित केले आहे.''

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एनटीटी डेटाचे उपाध्यक्ष हिदेएकी ओझाकी यांची भेट घेतली.